महाराष्ट्र टाईम्स 11 MAY 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलसंधारणात शिक्षकांचे श्रमदान

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

**विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पी.टी. शिक्षकांचा अभियानात सहभाग**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सोमवार (ता.९) पासून सुरू करण्यात आलेल्या जलसंधारण निर्मिती उपक्रमामध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पी.टी. (शारीरिक शिक्षण) शिक्षकांनी सहभाग घेतला. या अभियानामध्ये हे सर्व शिक्षक दोन दिवस सक्रिय सहभाग देणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या उपक्रमाचे औपचारिक उदघाटन करण्यात आले.




**शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या जलसंधारण निर्मिती उपक्रमामध्ये सहभागी झालेले विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पी.टी. शिक्षक.**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून शेततळे जलसंधारण योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. १३ मे पर्यंत हे श्रमदान शिबिर सुरू राहणार आहे. विद्यार्थ्यांचे श्रमदान सुरू असतानाच वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघ यांच्यावतीनेही या 'पाणी अडवा पाणी जिरवा' अभियानात सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाच्या बाभूळवन परिसरात श्रमदानातून शेततळे साकारण्याच्या कार्यात योगदान देण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित तिन्ही जिल्ह्यांतील महाविद्यालयीन शारीरिक शिक्षक एकत्र आले आहेत. जेसीबीच्या सहाय्याने गाळ काढण्याबरोबरच प्रस्तावित शेततळ्याच्यां चोहोबाजूंनी बंधारा तयार करण्याचे काम या दोन दिवसांत करण्यात येणार आहे. यासाठी होणारा खर्च तिन्ही जिल्ह्यांतील शारीरिक शिक्षण संचालकांमार्फत करण्यात येणार आहे.

**शुभ वर्तमान**

यावेळी बीसीयुडी संचालक डॉ. डी.आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी.के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख पी. टी. गायकवाड यांच्यासह शारीरिक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रमुख सहभागी

या उपक्रमात महादेव सूर्यवंशी (जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर), दीपक डांगे (पाटण कॉलेज, पाटण), संजय पाटील, (रेठरे बुद्रुक), राजू बनसोडे (नाईट कॉलेज, सांगली), गणेश सिंहासने (महिला महाविद्यालय, तासगांव), शिवराज गायकवाड (रहिमतपूर महाविद्यालय, रहिमतपूर), संदीप पाटील, बाजीराव पाटील तसेच अन्य शिक्षण संचालकांचे सहकार्य लाभत आहे.

पुण्यनगरी 11 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात बाभूळवान परिसरात होत असलेल्या शेततळयावर श्रमदान करत असताना वरिष्ठ शारिरिक शिक्षक .

# जलसंधारण कामात शारीरिक शिक्षकांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सोमवारपासून सुरू करण्यात आलेल्या जलसंधारण निर्मिती उपक्रमाला मंगळवारी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शारीरिक शिक्षकांच्या सहभागाचे आयाम लाभले. या अभियानामध्ये हे सर्व शिक्षक दोन दिवस सक्रिय सहभाग देणार आहेत. मंगळवारी सकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून शेततळे जलसंधारण योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. दि. १३ मे पर्यंत हे श्रमदान शिबिर सुरू राहणार आहे. विद्यार्थ्यांचे श्रमदान सुरू असतानाच वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघ यांच्या वतीनेही या 'पाणी आडवा पाणी जिरवा' अभियानात सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाच्या बाभूळवन परिसरात श्रमदानातून शेततळे साकारण्याच्या कार्यात योगदान देण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयीन शारीरिक शिक्षक एकत्र आले आहेत. जेसीबीच्या साहाय्याने गाळ काढण्याबरोबरच प्रस्तावित शेततळ्याच्या चोहोबाजूंनी बंधारा तयार करण्याचे काम या दोन दिवसात करण्यात येणार आहे. यासाठी होणारा खर्च तिन्ही जिल्ह्यातील शारीरिक शिक्षण संचालकांमार्फत करण्यात येणार आहे.

बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख पी. टी. गायकवाड यांच्यासह शारीरिक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामी महादेव सूर्यवंशी (जयसिंगपूर कॉलेज), दीपक डांगे (पाटण कॉलेज, पाटण), संजय पाटील, (रेठरे बुद्रुक), राजू बनसोडे (नाईट कॉलेज, सांगली), गणेश सिंहासने (महिला महाविद्यालय, तासगाव), शिवराज गायकवाड (रहिमतपूर महाविद्यालय, रहिमतपूर), संदीप पाटील, बाजीराव पाटील तसेच अन्य शिक्षण संचालकांचे सहकार्य लाभले.

लोकमत 11 MAY 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ : 'एनएसएस'चा उपक्रम; श्रमदानासह आर्थिक मदत**

# जलसंधारणाच्या कामात शारीरिक शिक्षकांचा सहभाग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) माध्यमातून सोमवार (दि. ९) पासून जलसंधारण निर्मितीचा उपक्रम सुरु केला आहे. यात मंगळवारी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शारीरिक शिक्षक सहभागी झाले. या अभियानामध्ये हे सर्व शिक्षक दोन दिवस सक्रिय सहभाग देणार आहेत.

विद्यापीठात सोमवार (दि. ९) पासून एनएसएसच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून शेततळे जलसंधारण योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. शुक्रवार (दि. १३)पर्यंत हे श्रमदानाचे शिबिर सुरु राहणार आहे. विद्यार्थ्यांचे श्रमदान सुरु असतानाच वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक




शिक्षण शिक्षक संघ यांच्या वतीनेही या 'पाणी अडवा, पाणी जिरवा' अभियानात सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला.

विद्यापीठाच्या बाभूळवन परिसरात श्रमदानातून शेततळे साकारण्याच्या कार्यात योगदान देण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित तिन्ही जिल्ह्यांतील महाविद्यालयीन शारीरिक शिक्षक एकत्र आले आहेत. 'जेसीबी'च्या साहाय्याने गाळ काढण्यासह प्रस्तावित शेततळ्याच्या चोहोबाजूंनी बंधारा तयार करण्याचे काम या दोन दिवसांत करण्यात येणार आहे. यासाठी होणारा खर्च तिन्ही जिल्ह्यांतील शारीरिक शिक्षण संचालकांमार्फत करण्यात येणार आहे. दरम्यान, मंगळवारी सकाळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

यावेळी 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख पी. टी. गायकवाड, आदी उपस्थित होते.

या उपक्रमात महादेव सूर्यवंशी (जयसिंगपूर कॉलेज), दीपक डांगे (पाटण कॉलेज), संजय पाटील (रेठरे बुद्रुक), राजू बनसोडे (नाईट कॉलेज, सांगली), गणेश सिंहासने (महिला महाविद्यालय, तासगाव), शिवराज गायकवाड (रहिमतपूर महाविद्यालय), संदीप पाटील, बाजीराव पाटील, आदी शारीरिक शिक्षण संचालक सहभागी झाले आहेत. (प्रतिनिधी)

महाराष्ट्र टाईम्स 11 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बुध अधिक्रमण आता २०१९ मध्ये

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हपूर**

शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे सोमवारी (ता.९) पन्हाळा येथून बुधाच्या अधिक्रमणाची डॉ. ए.के. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षणे घेण्यात आली. बुधाचे पुढील अधिक्रमण सन २०१९ मध्ये होणार असल्याची माहिती डॉ. शर्मा यांनी यावेळी दिली.

निरभ्र आकाशामुळे पन्हाळा येथून बुधाचे सूर्यासमोरून अधिक्रमण अतिशय उत्तम प्रकारे पाहता आले. सोमवारी सायंकाळी ४.४० वाजल्यापासून ते ६.४५ वाजेपर्यंत या अधिक्रमणाची विविध टप्प्यांवरील निरीक्षणे घेण्यात आली होती. पाच इंची टेलिस्कोपच्या सहाय्याने ही निरीक्षणे घेण्यात आली. यावेळी करण्यात आलेल्या नोंदीनुसार बुधाच्या पुढील अधिक्रमणाचा अभ्यास करण्यात आला.



शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे पन्हाळा येथून बुधाच्या अधिक्रमणाची डॉ. ए.के. शर्मा यांच्यां मार्गदर्शनाखाली निरीक्षणे घेताना संशोधक विद्यार्थी

**अभ्यासक डॉ. ए.के. शर्मा यांची माहिती**

बुधाचे संक्रमण शंभर वर्षातून साधारण १३ वेळा पहायला मिळते. किमान चार वर्षातून एकदा किंवा १० ते १२ वर्षांतून एकदा असा त्याचा कालावधी असतो. बुध हा सूर्यापासून सर्वात जवळचा ग्रह आहे. काही ठराविक वर्षांनी हा ग्रह सूर्य व पृथ्वीच्यामध्ये येतो, याला बुधाचे अधिक्रमण म्हणतात. तो सूर्यासमोरून सरकत जात असताना सूर्याच्या पृष्ठभागावरून काळसर ठिपका सरकल्याप्रमाणे दिसतो. यापूर्वीचे अधिक्रमण ८ नोव्हेंबर २००६ रोजी झाले होते. पुढील संक्रमण ११ नोव्हेंबर २०१९ रोजी होईल, अशी माहिती डॉ. शर्मा यांनी यावेळी दिली. यावेळी अवकाश संशोधकांसह हौशी निरीक्षक व पर्यटकांनीही हे अधिक्रमण पाहण्याचा आनंद घेतला.


पुढारी
11 MAY 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बुधाचे पुढील अधिक्रमण २०१९ ला!

## विद्यापीठ अवकाश संशोधन केंद्राने नोंदविली निरीक्षणे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे पन्हाळा येथून बुधाच्या अधिक्रमणाची डॉ. ए. के. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षणे घेण्यात आली. बुधाचे पुढील अधिक्रमण २०१९ मध्ये होणार आहे.




**कोल्हापूर : सूर्याच्या समोर वर्तुळामध्ये दिसणारा बुध आहे; अन्यत्र दिसणारा काळा ठिपका सौरडाग आहे.**

निरभ्र आकाशामुळे पन्हाळा येथून बुधाचे सूर्यासमोरून अधिक्रमण अतिशय उत्तम प्रकारे पाहता आले. सोमवारी (दि. ९) सायंकाळी ४.४० वाजल्यापासून ते ६.४५ वाजेपर्यंत या अधिक्रमणाची विविध टप्प्यांवरील निरीक्षणे घेण्यात आली. पाच इंची सीएस प्लस टेलिस्कोपच्या साह्याने ही निरीक्षणे घेण्यात आली.

बुधाचे संक्रमण शंभर वर्षांतून साधारण १३ वेळा पाहायला मिळते. किमान चार वर्षांतून एकदा किंवा १० ते १२ वर्षांतून एकदा असा त्याचा कालावधी असतो. बुध हा सूर्यापासून सर्वात जवळचा ग्रह आहे. काही ठरावीक वर्षांनी हा ग्रह सूर्याच्या व पृथ्वीच्या मध्ये येतो, याला बुधाचे अधिक्रमण म्हणतात. तो सूर्यासमोरून सरकत जात असताना सूर्याच्या पृष्ठभागावरून काळसर ठिपका सरकल्याप्रमाणे दिसतो. यापूर्वीचे अधिक्रमण ८ नोव्हेंबर २००६ रोजी झाले होते. पुढील संक्रमण ११ नोव्हेंबर २०१९ रोजी होईल, अशी माहिती डॉ. शर्मा यांनी यावेळी दिली. यावेळी अवकाश संशोधकांसह हौशी निरीक्षक व पर्यटक अधिक्रमण पाहण्याचा आनंद घेतील.


लोकमत 11 MAY 2016
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बुधाचे अधिक्रमण तीन वर्षांनंतर होणार

## ए. के. शर्मा : पन्हाळ्यावरील अवकाश संशोधन केंद्रातील निरीक्षणे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे सोमवारी पन्हाळा येथून बुधाच्या अधिक्रमणाची डॉ. ए. के. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षणे घेण्यात आली. बुधाचे पुढील अधिक्रमण सन २०१९ मध्ये होणार असल्याची माहिती डॉ. शर्मा यांनी दिली.

निरभ्र आकाशामुळे पन्हाळा येथून बुधाचे सूर्यासमोरून अधिक्रमण अतिशय उत्तम प्रकारे पाहता आले. सोमवारी (दि. ९) सायंकाळी ४.४० पासून ते ६.४५ वाजेपर्यंत या अधिक्रमणाची विविध टप्प्यांवरील निरीक्षणे घेण्यात आली. पाच इंची सीएस प्लस टेलिस्कोपच्या साहाय्याने ही निरीक्षणे घेण्यात आली. बुधाचे संक्रमण शंभर वर्षांतून साधारणत: १३ वेळा पाहायला मिळते. किमान चार वर्षांतून एकदा किंवा १० ते १२ वर्षांतून एकदा असा त्याचा कालावधी असतो. बुध हा सूर्यापासून सर्वांत जवळचा ग्रह आहे. काही ठरावीक वर्षांनी तो सूर्याच्या व पृथ्वीच्या मध्ये येतो, याला 'बुधाचे अधिक्रमण' म्हणतात. तो सूर्यासमोरून सरकत असताना सूर्याच्या पृष्ठभागावरून काळसर ठिपका सरकल्याप्रमाणे दिसतो. यापूर्वीचे अधिक्रमण ८ नोव्हेंबर २००६ रोजी झाले होते. पुढील संक्रमण ११ नोव्हेंबर २०१९ रोजी होईल, अशी माहिती डॉ. शर्मा यांनी दिली. यावेळी अवकाश संशोधकांसह हौशी निरीक्षक व पर्यटकांनीही हे अधिक्रमण पाहण्याचा आनंद घेतला. (प्रतिनिधी)



06:25 PM 6:45 PM

पन्हाळा येथील शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातून सोमवारी सायंकाळी बुधाच्या अधिक्रमणाची छायाचित्रे घेण्यात आली. सूर्यासमोर वर्तुळामध्ये दिसणारा बुध आहे; तर अन्यत्र दिसणारा काळा ठिपका म्हणजे सौरडाग आहे.

लोकमत
11 MAY 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दुसऱ्या दिवशी २३६ जणांनी दिली प्रवेशपरीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येत आहे. त्यात मंगळवारी दुसऱ्या दिवशी एमएसडब्ल्यू, एमसीए अशा सहा अभ्यासक्रमांसाठी २३६ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी १०५ जण परीक्षेला गैरहजर राहिले.

कोल्हापूर, सांगली, सातारा येथील केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली.



त्यात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट अभ्यासक्रमातील एमएसडब्ल्यू (९७), एमआरएस (२६), एमसीए (१३), एमबीए (८४) आणि एम. टेक (१३) तर, ऑडनंबरद्वारे तीन अशा एकूण २३६ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परीक्षा दिली. या अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी २३२ जणांनी नोंदणी केली होती.

दरम्यान, आज, बुधवारी इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र, एमसीए (सायन्स् कॉमर्स), एम.एस्सी मॅथेमॅटिक्स, वनस्पतीशास्त्र, अ‍ॅप्लाईड स्टॅटिस्टिक्स् अ‍ॅण्ड इन्फॉर्मेटिक्स्, भौतिकशास्त्र, भूगर्भशास्त्र, सूक्ष्म जीवशास्त्रची प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. (प्रतिनिधी)

## 'बीजेसी'चे विद्यार्थी वाढले

वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या बीजेसी, एमजेसी आणि मास कम्युनिकेशनसाठी सोमवारी प्रवेश परीक्षा झाली. बीजेसीसाठी १२२ जणांनी परीक्षा दिली. यात गेल्यावर्षीच्या तुलनेत २५ विद्यार्थ्यांची वाढ झाली. एमजेसीच्या विद्यार्थ्यांमध्ये घट झाली असून १८ जणांनी, २१ जणांनी मास कम्युनिकेशनसाठी परीक्षा दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स 11 MAY 2016

# डॉ. पी. एस. कांबळे अर्थशास्त्र विभागप्रमुखपदी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुखपदी प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांची नियुक्ती झाली आहे. डॉ. कांबळे गेली वीस-बावीस वर्षे अध्यापन करीत आहेत. एन्व्हार्यमेंटल अँड रिसोर्स इकॉनॉमिक्स आणि पब्लिक इकॉनॉमिक्स असे त्यांचे अभ्यासविषय आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा संशोधकांनी पीएचडी केली असून, सध्या आठजण पीएचडीसाठी संशोधन करीत आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांचे ११५ शोधप्रबंध प्रसिद्ध झाले आहेत. विद्यापीठीय पातळीवर अनेक परिषदांचे त्यांनी यशस्वी संयोजन केले आहे.